तरुण भारत संवाद | सोमवार, दि. ४ मे २०२६

# कोल्हापुरात ६ रोजी 'झीरो शॅडो डे'

प्रतिनिधी, कोल्हापूर

कोल्हापुरात बुधवार, ६ रोजी 'झीरो शॅडो डे'चा अनुभव घेता येणार असून या दिवशी दुपारी १२ वाजून २९ मिनिटे ११ सेकंदांपासून ते १२ वाजून ३० मिनिटांपर्यंत जवळजवळ ५० सेकंदांपर्यंत आपली सावली अदृश्य होणार असल्याची माहिती विवेकानंद महाविद्यालयाचे पदार्थविज्ञान पदव्युत्तर विभागाचे प्रोफेसर डॉ. मिलिंद मनोहर कारंजकर यांनी दिली.

डॉ. करंजकर म्हणाले, 'झिरो शॅडो डे' ही घटना पृथ्वीच्या भौगोलिक स्थितीशी आणि सूर्याच्या आकाशातील स्थानाशी संबंधित आहे. कर्कवृत्त आणि मकरवृत्त या दोन वृत्तांच्यामध्ये राहणाऱ्या लोकांना वर्षातून दोन



वेळेला हा शून्य सावलीचा आनंद घेता येतो. मात्र जे लोक कर्कवृत्त, मकरवृत्त आणि विषुववृत्त या ठिकाणी

## सावली होणार अदृश्य

राहतात. त्यांना वर्षातून एकदाच शून्य सावली दिवसाचा आनंद घेता येतो. तर कर्कवृत्ताच्या वरच्या भागात, मकरवृत्ताच्या खालच्या भागात राहणाऱ्या लोकांना मात्र शून्य सावली दिवसाचा आनंद घेता येत नाही.

आपल्या दैनंदिन जीवनात सावली हा एक नैसर्गिक भाग असतो. असं म्हटलं जातं की आपली सावली कधीच आपली साथ सोडत नाही परंतु मात्र वर्षातून काही विशिष्ट दिवस असे येतात, जेव्हा दुपारच्या ठराविक वेळी आपली अथवा कोणताही उभ्या वस्तूची सावली काही कालावधीसाठी पूर्णपणे नाहीशी होते. या अद्भुत घटनेला खगोल शास्त्रामध्ये शून्य सावली अथवा झिरो शॅडो असे म्हणत असल्याचें त्यांनी स्पष्ट केले.

वर्षातून तीन महिन्यांनी मकरवृत्तावर, नंतर तीन महिन्यांनी परत विषुववृत्तावर आणि परत तीन महिन्यांनी कर्कवृतावर आपणांस शून्य सावली दिवसाचा आनंद घेता येतो. मात्र कर्कवृत्त, मकरवृत्त या दोन स्थानांमध्ये जे लोक राहतात त्यांना वर्षातून दोनदा शून्य सावलीचा अनुभव घेता येतो. तसेच बरोबर तीन महिन्यांनी सूर्याच्या दक्षिणायन काळात ६ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२ वाजून ३९ मिनिटांपासून ५० सेकंदपर्यंत परत एकदा शून्य सावलीचा आनंद घेता येणार आहे.